सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १०८ | गुरुवार, दि. ८ जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com






**डॉ. परीक्षित बाविस्कर**
लोकनियुक्त नगराध्यक्ष, अमळनेर



**श्री. सोमचंद संदानशिव**
माजी नगरसेवक, अमळनेर



**श्री. संदीप पाटील**
माजी जि. प. सदस्य, अमळनेर.



**ताहा बुकवाला**
रोटरी क्लब, अमळनेर



**श्री. योगेश सोनार**
अमळनेर



**श्री. हर्षल विसपुते**
अमळनेर



**श्री. कैलास पाटील**
अंबिका मंगल कार्यालय, अमळनेर

## दिनविशेष
८ जानेवारी

- पृथ्वी परिभ्रमण दिनराजस्थान विद्यापीठाची स्थापना झाली.
- लता मंगेशकर यांची १९९९ च्या एन.टी. रामाराव राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड झाली.
- भारत आणि व्हिएतनाम यांच्यात संस्कृती, पर्यटन आणि अणुऊर्जेचा शांततापूर्ण वापर यासंबंधी तीन करार झाले.

**अमळनेरमधील राजकारण...**

# वरवर शांतता..आतून धगधग...!

## पालिका व खान्देश शिक्षण मंडळ संस्थेच्या त्रैवार्षिक निवडणुकीनंतरची स्थिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिका निवडणूक नुकतीच झाली. त्यात शिवसेनेचे वर्चस्व सिद्ध होऊन लोकनियुक्त नगराध्यक्षपदी डॉ. परीक्षित बाविस्कर निवडून आले. त्यांनी नवीन वर्षाच्या प्रारंभी गुरुवार, १ जानेवारी २०२६ रोजी आपला पदभारही सांभाळला.

या निवडणुकीत अपक्षांनी मुसंडी मारत १३, आमदार अनिलदादा पाटील, खासदार श्रीमती स्मिताताई वाघ व माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील यांच्या नेतृत्वात शहर विकास आघाडीचे १२ उमेदवार, माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांच्या नेतृत्वात शिवसेनेचे १०, तर 'मविआ'चा १ उमेदवार निवडून आला. त्याचप्रमाणे ख्यातनाम खान्देश शिक्षण मंडळ या संस्थेच्या अध्यक्ष-१, उपाध्यक्ष-२, विश्वस्त-१ यासह कार्यकारी मंडळ सदस्यपदाच्या ८ जागांसाठीही त्रैवार्षिक निवडणूक झाली. त्यात कार्यकारी मंडळ सदस्यपदाच्या ८ पैकी ६ जागांवर प्रस्थापित आशीर्वाद पॅनलच्या उमेदवारांनी विजय मिळविला. तर पंकज गोविंद मुंदडे व सौ. लीनाताई प्रवीण पाटील हे अपक्ष उमेदवार निवडून आले. विरोधी परिवर्तन पॅनलला दारुण पराभव पत्करावा लागला.

पालिका निवडणुकीनंतर नागरिकांमध्ये तसेच खा. शि. मंडळ संस्थेच्या सदस्यांत आता शांतता वातावरण झाली आहे. मात्र आता पालिकेतील उपनगराध्यक्षपद व स्वीकृत सदस्यांसाठी तसेच खा. शि. मंडळ संस्थेच्या कार्याध्यक्ष व कार्योपाध्यक्ष या पदांसाठीच्या निवडीकरिता तसेच मेजॉरिटी व मायनॉरिटी अर्थात सत्तास्थानी राहण्यासाठी आणि काहींना सत्तेबाहेरच ठेवावे की नाही, याबाबत हालचाली गतिमान झाल्या आहेत.

शुक्रवार, दि. ९ जानेवारी रोजी पालिकेच्या सभागृहात उपनगराध्यक्ष व स्वीकृत सदस्यांची निवड, तर खा. शि. मंडळ संस्थेच्या नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त व कार्यकारी मंडळ सदस्यांची पदग्रहण सभा रविवार, दि. ११ जानेवारी २०२६ रोजी प्रताप महाविद्यालयात होणार आहे.

**(पान ३ वर)**

**पुनश्च जुन्यांनाच संधी की दुसऱ्यांची होणार 'एंट्री'?**

खान्देश शिक्षण मंडळ या संस्थेचे गेल्या वेळी कार्याध्यक्ष डॉ. संदेश बिपीन गुजराथी, तर कार्योपाध्यक्ष नीरज दीपचंद अग्रवाल होते. नुकत्याच झालेल्या निवडणुकीतही त्यांनी आपले वर्चस्व कायम राखत विजय मिळविला आहे. संस्थेत ही पदे एका वर्षासाठीच दिली जातात. त्यामुळे आता खांदेपालट अटळ असल्याचे संकेत आहेत.

# उपनगराध्यक्षपदासाठी देशमुख, पवार, महाजन यांची नावे आघाडीवर

## उपनगराध्यक्ष, स्वीकृत सदस्यांची उद्याच्या सभेत होणार निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेच्या उपनगराध्यक्ष व स्वीकृत सदस्य पदांच्या निवडीसाठी पीठासीन अधिकारी तथा नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांनी शुक्रवार, दि. ९ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता सभा बोलावली आहे. नगरपरिषद अधिनियम १९६५ च्या ५१ अ-१ अ च्या पोटकलम ९ नुसार पालिका व सदस्य निवडून आल्यानंतर राजपत्रात नावे प्रसिद्ध झाल्यानंतर २५ दिवसांत उपनगराध्यक्षपदाची निवड आणि १ ब नुसार स्वीकृत सदस्य निवडीसाठी सभा बोलावणे आवश्यक असते. नगराध्यक्ष या सभेचे पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहतात.

दरम्यान, उपनगराध्यक्षपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. मात्र नगरसेवक महेश देशमुख, साहेबराव पवार व अनिल महाजन यांची नावे यासाठी आघाडीवर असल्याचे सूत्रांकडून बोलले जात आहे. तर चार स्वीकृत सदस्यही निवडले जाणार आहेत. त्यात शिवसेना गटाचे दोन, अपक्ष गटाचा एक आणि शहर विकास आघाडीचा एक याप्रमाणे स्वीकृत सदस्यांची वर्णी लागणार आहे. मात्र उपनगराध्यक्षपदासाठी माजी आमदार शिरीषदादा चौधरी कोणाच्या नावाला पसंती देतात, याकडे आता सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.




**स्वीकृत सदस्य, उपनगराध्यक्षपदाची निवड प्रक्रिया**

दि. ९ जानेवारी रोजी दुपारी १२ ते २ नामनिर्देशन पत्र देणे व स्वीकारण्याची मुदत आहे. नामनिर्देशन पत्रांची छाननी होऊन पात्र उमेदवारांची नावे जाहीर झाल्यानंतर माघारीसाठी फक्त १५ मिनिटांची मुदत दिली जाते. त्यांनतर आवश्यक असल्यास निवडणूक घेण्यात येईल. एकच उमेदवारी अर्ज असल्यास उपनगराध्यक्षपदाच्या उमेदवाराला बिनविरोध विजयी घोषित केले जाते. पालिकेतील गटांच्या सदस्यसंख्येनुसार स्वीकृत सदस्यांची संख्या ठरते. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आलेल्या पात्र उमेदवारांना स्वीकृत सदस्य म्हणून जाहीर केले जाते. शिवसेना व अपक्ष आघाडीला तीन, तर शविआला स्वीकृत सदस्यांची एक जागा मिळेल.

# शिरूड येथे आजपासून हरिनाम कीर्तन सप्ताह

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील शिरूड येथे गुरुवार, दि. ८ जानेवारीपासून अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहाचे आयोजन केले आहे. कीर्तन सप्ताहाचे यंदा २७ वे वर्ष आहे. त्यामुळे गावासह संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.

कीर्तन सप्ताहांतर्गत दररोज पहाटे ५ ते सकाळी ६ दरम्यान काकड आरती होईल. तसेच सायंकाळी ५ ते ६ या वेळेत हरिपाठ होईल. यासोबतच हरिनाम जप, अभंग गायन, कीर्तन व प्रवचनांचेही आयोजन केले आहे. त्यामुळे पंचक्रोशीत आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे. सप्ताहात नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार व संतपरंपरेचे अभ्यासक सहभागी होणार आहेत. वारकरी संप्रदायाच्या परंपरेनुसार नामस्मरणातून समाजात शांतता, सद्भावना व आध्यात्मिक जागृती घडविण्याचा यामागे मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. या सप्ताहाची सांगता १५ जानेवारी रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत काल्याच्या कीर्तनाने होईल. त्यानंतर दुपारी १२ ते ४ या वेळेत महाप्रसाद वाटप होईल. या भक्तिमय कीर्तन सोहळ्यास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती द्यावी. तसेच शिरूडसह पंचक्रोशीतील भजनी मंडळांसह पखवाज वादक, मृदंगाचार्य, टाळकरी, विणेकरी यांच्यासह भक्तजणांनी या अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहात विविध कीर्तनांच्या श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक समितीने केले आहे. दरम्यान, कीर्तन सप्ताहामुळे शिरूडमधील ग्रामस्थांत उत्साहाचे वातावरण आहे.

# तिन्ही पत्रकार संघटनांच्या पुढाकाराने अमळनेरमध्ये पत्रकार दिन साजरा



*अमळनेर : आद्य पत्रकार तथा दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पणप्रसंगी तिन्ही पत्रकार संघटनांचे पदाधिकारी व सदस्य.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आद्य पत्रकार तथा दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त मंगळवार, दि. ६ जानेवारी रोजी अमळनेर शहर व तालुका पत्रकार संघटना, व्हॉईस ऑफ मीडिया आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ या तिन्ही संघटनांच्या वतीने येथे पत्रकार दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम सर्वच पत्रकारांच्या एकतेचा प्रतीक ठरला.

सुरूवातीला ज्येष्ठ पत्रकारांच्या हस्ते आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन होऊन माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर उपस्थित पत्रकार बांधवांनी सामूहिक पूजन केले. ज्येष्ठ पत्रकार डॉ. डिगंबर महाले, पांडुरंग पाटील व संजय पाटील यांनी मनोगतातून उपस्थित पत्रकारांना मार्गदर्शन केले. यावेळी विविध क्षेत्रांत निवड व पुरस्कारप्राप्त पत्रकारबांधवांचा यथोचित सन्मान करण्यात आला. खा. शि. मंडळ संस्थेतील नवनिर्वाचित पदाधिकारी व नवनिर्वाचित नगरसेवक यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ पत्रकार सुभाष पाटील घोडगावकर, किरण पाटील, चंद्रकांत काटे, अमळनेर शहर व तालुका पत्रकार संघटनेचे अध्यक्ष चेतन राजपूत, व्हॉईस ऑफ मीडियाचे तालुकाध्यक्ष उमेश काटे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटनेचे प्रवीण बैसाणे यांच्यासह तिन्ही पत्रकार संघटनांचे पदाधिकारी व पत्रकारबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. तालुक्यातील लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी याप्रसंगी उपस्थिती देऊन पत्रकारांचा सन्मान केला. आर. जे. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. उमेश काटे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी अमळनेर शहर व तालुका पत्रकार संघटनेचे सचिव जितेंद्र ठाकूर व सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी परिश्रम घेतले. पत्रकार दिन सोहळा तिन्ही संघटनांनी एकत्रितपणे पुढाकार घेऊन साजरा केल्याने या सोहळ्याचे समाजातील सर्वच स्तरातून कौतुक झाले.





# तीन बार फेल होकर भी नहीं मानी हार

**सक्सेस स्टोरी**

## फिर यूपीएससी में टॉप कर रच दिया इतिहास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जो सफल होने का सपना देखते हैं, वह असफलताओं से नहीं डरते। असफलताओं का निडर होकर सामने करने वाले इतिहास रचते हैं और ऐसा ही इतिहास रचा है। कनिका अनभ ने। तीन बार असफलता के बाद यूपीएससी आईएफएस २०२४ की टॉपर कनिका अनभ को अपनी पहली पोस्टिंग मिली है। भारत सरकार ने उन्हें ओडिशा कैडर दिया है। कनिका अनभ आयएएस टीना डाबी से प्रेरित हैं।

### कनिका अनभ ने रचा इतिहास

जो सफल होने का सपना देखते हैं, वह असफलताओं से नहीं डरते। असफलताओं का निडर होकर सामने करने वाले इतिहास रचते हैं और ऐसा ही इतिहास रचा है कनिका अनभ ने।

### आईएफएस टॉपर

तीन बार असफलता के बाद यूपीएससी आईएफएस २०२४ की टॉपर कनिका अनभ को अपनी पहली पोस्टिंग मिली है। भारत सरकार ने उन्हें ओडिशा कैडर दिया है।

### वन सेवा कैडर अलॉटमेंट

देश में भारतीय वन सेवा के परीक्षा परिणाम २०२४ के चयनित आईएफएस अफसरों को भारत सरकार ने कैडर अलॉट किया है। इसको लेकर पर्यावरण और वायु जलवायु मंत्रालय ने सूची जारी की है।

### टीना डाबी को बताया प्रेरणा

आईएफएस सेवा में पहली रैंक हांसिल करने वाली झारखंड की राजधानी रांची की रहने वाली कनिका अनभ राजस्थान की सबसे चर्चित आईएएस टीना डाबी को अपना इंस्पिरेशन मानती है। यह बात उन्होंने एक इंटरव्यू के दौरान कही।

### तीन बार असफल हुई

कनिका को यूपीएससी में तीन बार असफलता का मुंह देखने को मिला। इसके बाद भी उन्होंने हार नही मानी और हिम्मत दिखाते हुए फिर से परीक्षा में बैठी।

### चौथी बार में पहली रैंक

२०२४ में कनिका ने आईएफएस में पहली रैंक हासिक की। कनिका ने बताया कि उन्होंने हर दिन १० घंटे पढाई की। इसके अलावा २ घंटे के शेड्यूल को अलग-अलग श्रेणी में बांटा।

### खूद को किया साबित

भारतीय वन सेवा की टॉपर कनिका अनभ ने साबित कर दिया कि असफलताओं का निडर होकर सामने करने वाले इतिहास रचते हैं।



# हॉटेल्समधील खोल्यांमध्ये घड्याळ का नसते?

**नेमके काय कारण?**



हॉटेल्सची रचना ग्राहकांना रोजच्या दिनक्रमातून बाहेर काढण्यासाठी केली जाते. त्यांना रोजच्या व्यस्त वेळापत्रकातून अधिक निवांत मिळावा, यासाठी वेळेची जाणीव करून दिली जात नाही घरी, ऑफिसमध्ये अलार्म, मीटिंग, डेडलाईन्स असतात. त्यामुळे हॉटेलमध्ये वेळेची सतत आठवण करून देणाऱ्या गोष्टी काढून टाकल्यामुळे ग्राहक रोजच्या धबडग्यातून मुक्त होऊ शकतो.

सतत वेळ पाहिल्याने ताण आणि चिंता वाढते, असा अभ्यास मानसशास्त्रज्ञांनी केलेल्या निरीक्षणातून समोर आले आहे. त्यामुळे घड्याळापासून काही वेळ दूर राहिल्यास निवांतपण मिळतो. लक्झरी हॉटेल्समध्ये मानसिक गोंधळ कमी करण्यासाठी सौम्य प्रकाश, शांत रंगसंगती, कमी आवाजाची रचना केलेली असते, टिक- टिक करणारे घड्याळ या वातावरणाला बाधा आणू शकते. बहुतांश प्रवासी वेळ पाहण्यासाठी मोबाईल फोन, स्मार्टवॉच किंवा लॅपटॉपवर अवलंबून असतात. त्यामुळे हॉटेल्सच्या खोलीत घड्याळे लावणे अनावश्यक ठरू लागले आहे.

पूर्वी हॉटेलमधील घड्याळे चुकीची वेळ, विचित्र वेळी वाजणारे अलार्म, सेट करायला अवघड, सततच टिक-टिक आवाज करणारी होती. त्यामुळे प्रवाशींच्या झोपेत अडथळा येत होता प्रवाशी घड्याळाकडे पाहत नाहीत, ते निवांत थांबतात. नाश्ता निवांतपणे करतात, लॉबीमध्ये वेळ घालवतात, असे निरीक्षण आदरातिथ्य क्षेत्रातील अभ्यासातून समोर आले आहे. झोपेवरील अभ्यासातून असे दिसून आले आहे, की झोप येण्याचा प्रयत्न करताना वारंवार घड्याळाकडे पाहिल्याने अनिद्रा वाढू शकते. वेळ सरकत असल्याने रात्री २ ते ३ या वेळेत अधिक चिंता वाढते.

आजच्या काळात लोकांना स्वतंत्र घड्याळांची गरजच उरलेली नाही. स्मार्टफोनने अलार्म घड्याळ, हातघड्याळ, कॅलेंडर सगळ्यांची जागा घेतली आहे. त्यामुळे खोलीत ठेवलेली घड्याळे आली.

# कोबीचे पॅनकेक : मुले आणि मोठ्यांना आवडेल असा चविष्ट आणि हेल्दी नाश्ता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



मुलांना भाज्या, विशेषतः कोबी खाण्याचा कंटाळा येतो. मोठ्यांनाही कोबी म्हटले, की नाक मुरडतात. पण आज आम्ही अशी एक भन्नाट रेसिपी घेऊन आलो आहोत जी कोबीला सर्वांची आवडती बनवेल. कोबीचे पॅनकेक हा नाश्ता चविष्ट, पौष्टिक आणि कमी तेलात तयार होतो. मुलांच्या डब्यासाठी किंवा सकाळच्या नाश्त्यासाठी हा एक उत्तम पर्याय आहे. चला, ही सोपी रेसिपी जाणून घेऊया आणि लगेच लिहून ठेवा.

**कोबीचे पॅनकेक रेसिपी**

**साहित्य (४-५ लहान पॅनकेकसाठी) :**

- १ वाटी बारीक चिरलेला कोबी (किसलेला किंवा मिक्सरमध्ये बारीक केलेला)
- १ छोटे गाजर (किसलेले)
- १ लहान कांदा (बारीक चिरलेला)
- १ वाटी गव्हाचे पीठ (किंवा बेसन, मिश्रणासाठी)
- १ टीस्पून जिरे
- १/२ टीस्पून लाल तिखट (चवीनुसार)
- १/4 टीस्पून हळद
- चवीनुसार मीठ
- पाणी (मिश्रणासाठी, आवश्यकतेनुसार)
- तेल किंवा तूप (भाजण्यासाठी)

**कृती**

1) कोबी, गाजर आणि कांदा मिक्सरमध्ये बारीक करून घ्या किंवा किसणीने किसून घ्या.
2) एका मोठ्या भांड्यात हे बारीक केलेले साहित्य घ्या. त्यात गव्हाचे पीठ, जिरे, लाल तिखट, हळद आणि मीठ टाका.
3) हळूहळू थोडे पाणी घालून मध्यम घट्ट मिश्रण तयार करा (पॅनकेकच्या पिठासारखे).
4) नॉन-स्टिक तव्यावर थोडे तेल किंवा तूप लावा आणि मध्यम आचेवर गरम करा.
5) मिश्रणाचा एक मोठा चमचा तव्यावर पसरवून लहान पॅनकेकचा आकार द्या.
6) दोन्ही बाजूंनी 2-3 मिनिटे खरपूस भाजून घ्या, जोपर्यंत पॅनकेक सोनेरी आणि कुरकुरीत होत नाही.
7) टोमॅटो सॉस, चटणी किंवा दह्यासोबत गरमागरम सर्व्ह करा.

**टिप्स**

चव वाढवण्यासाठी : मिश्रणात बारीक चिरलेली कोथिंबीर किंवा हिरवी मिरची घालू शकता.

**हेल्दी पर्याय :** गव्हाच्या पिठाऐवजी ओट्स किंवा मल्टिग्रेन पीठ वापरू शकता.

**डब्यासाठी :** पॅनकेक थंड झाल्यावर डब्यात पॅक करा, जेणेकरून ते ताजे राहतील.

**का खास आहे ही रेसिपी?**

**पौष्टिक :** कोबी आणि गाजरामुळे जीवनसत्त्वे आणि फायबर मिळतात.

**सोपी :** कमी साहित्य आणि कमी वेळेत तयार.

**सर्वांचे आवडते :** मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना आवडेल.

**कमी तेल :** नॉन-स्टिक तव्यावर कमी तेलात बनवता येते.

हा चविष्ट आणि हेल्दी नाश्ता बनवून पाहा. मुलांसह सगळ्यांना आश्चर्यचकित करा.

# मुलीसोबत डेटवर जाण्यासाठी ३१ हजार रुपये

## लग्नासाठी २५ लाख आणि मुले झाली तर सर्व काही मोफत!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




जागतिक तांत्रिक आणि आर्थिक प्रगतीमध्ये आघाडीवर असलेला एक देश आता एका अनोख्या सामाजिक आव्हानाला तोंड देत आहे. वेगवान जीवनशैली आणि कामाचा ताण तरुण पिढीला नातेसंबंध, विवाह आणि मुलांपासून दूर नेत आहे. या देशातील जन्मदर कमी होत आहे. त्यावर उपाय म्हणून सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. दक्षिण कोरियातील नागरिकांच्या जीवनशैलीने पारंपरिक नातेसंबंध आणि कुटुंबाच्या महत्त्वाला आव्हान दिले आहे. सकाळपासून सायंकाळपर्यंत कामात गुंतलेले युवक केवळ डेटिंगसाठी वेळ काढू शकत नाहीत, तर लग्न करुन संसार कसा थाटणार आणि पुढे मूलबाळ होण्याचा कसा विचार करणार? असा प्रश्न कोरियातील सरकारला पडला आहे. त्यावर तेथील सरकारने मोठा उपाय काढला आहे.

तरुणांच्या जीवनशैलीचा परिणाम म्हणजे देशातील जन्मदर जगातील सर्वात खालच्या स्तरावर पोहोचला आहे. युवक महागाई, करिअर आणि वैयक्तिक स्वातंत्र्यामुळे कौटुंबिक जबाबदाऱ्या स्वीकारण्यात थेट नकार देतात. ही सामाजिक समस्या पाहता दक्षिण कोरियाच्या सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. सरकारचा विश्वास आहे की आर्थिक सुरक्षा आणि प्रोत्साहन मिळाल्यास युवक नातेसंबंध आणि कुटुंबाकडे आकर्षित होतील. याच विचाराने डेटिंगसाठी अनोखे आर्थिक सहाय्य सुरू केले आहे. जर एखादा युवक किंवा युवती डेटवर जात असेल, तर सरकार सुमारे ३५० अमेरिकी डॉलर म्हणजे अंदाजे ३१ हजार रुपये पर्यंतची मदत देते. ही राशी जेवण-खाणे, मनोरंजन आणि गतिविधींसाठी दिली जाते.

सरकारची ही योजना डेटिंगपुरती मर्यादित नाही, तर सरकार लग्नालाही प्रोत्साहन देत आहे. जर जोडपे लग्नाचा निर्णय घेते, तर सरकार अंदाजे २५ लाख रुपये पर्यंतची आर्थिक मदत देते. ही राशी लग्नाशी संबंधित मोठ्या खर्चाला कमी करते आणि युवकांना आर्थिक चिंतेशिवाय विवाह करण्यासाठी प्रेरित करते.

सरकारी मदतीचे उद्देश्य युवा जोडप्यांना आर्थिक बोझाच्या भीतीने लग्न टाळण्यापासून वाचवणे आहे. लग्नानंतर जर जोडपे मुले होण्याचा निर्णय घेते, तर सरकार मुलांच्या संगोपन, शिक्षण आणि काळजीत मदत करते. विविध योजनांतर्गत आर्थिक सहाय्य दिले जाते. अनेक प्रकरणांमध्ये सरकार पालकांच्या मदतीत भागीदार बनते. जेणेकरून मुलांची जबाबदारी पूर्णपणे कुटुंबावर पडू नये. आर्थिक चिंता कमी झाल्यास युवक कुटुंब वाढवण्याकडे सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारतात.

# अमिताभ बच्चन आणि माझ्या वडिलांबरोबर कधीच काम करू नये

## 'धुरंधर' फेम अक्षय खन्ना असे का म्हणाला?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोशल मीडियामुळे अनेकदा कलाकारांच्या जुन्या मुलाखतींमधील त्यांची वक्तव्ये, त्यांच्या प्रतिक्रिया पुन्हा एकदा व्हायरल झाल्यामुळे ते चर्चेत येत असतात. असेच काहीसे झाले 'धुरंधर' फेम अक्षय खन्नाबरोबर घडले.

आदित्य धर लिखित व दिग्दर्शित 'धुरंधर'मुळे अक्षय खन्ना सध्या चर्चेत आहे. त्यात त्याने साकारलेल्या रहमान डकैत भूमिकेसाठी त्याचे कौतुक होत आहे. तर दुसरीकडे अभिनेत्याने 'दृश्यम ३'मधून घेतलेल्या एक्झिटमुळे तो वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. अशातच आता एका जुन्या मुलाखतीमध्ये अक्षयने अमिताभ बच्चन आणि त्याचे वडील विनोद खन्ना यांच्याबद्दल प्रतिक्रिया दिलेली ती पुन्हा एकदा चर्चेत आली आहे.

### अक्षय खन्ना नेमके काय म्हणाले?



अक्षयने त्या मुलाखतीत अमिताभ बच्चन व त्याचे वडील विनोद खन्ना यांच्याबरोबर काम करण्याचा त्याचा अनुभव सांगत त्या दोघांबरोबर काम करणे खूप कठीण असल्याचे म्हटले होते. २००८ मध्ये एका कार्यक्रमात त्याने सांगितले. तो म्हणाला, की अशी काही माणसे असतात, की ज्यांच्याबरोबर तुम्ही काम करू नये. त्यापैकीच एक म्हणजे



माझे वडील आणि अमिताभ बच्चन. ज्या आत्मविश्वासाने ते कॅमेऱ्यासमोर उभे राहतात आणि काम करतात तसे काम करणे आव्हानात्मक असते. अक्षय खन्ना पुढे त्याचे वडील विनोद खन्ना यांच्याबद्दल म्हणाला, की माझ्या वडिलांबरोबर काम करणे खूप कठीण आहे. त्यांच्याकडे जी कला आहे ती माझ्याकडे नाही. त्यांच्यासारख्या स्क्रीन प्रेझेंस माझ्याकडे नाही.

अक्षय खन्नाला यानंतर २०१७ मध्ये एका वृत्तानुसार विनोद खन्ना यांच्या बायोपिकमध्ये काम करायला आवडेल का? असे विचारल्यानंतर तो म्हणाला, की वडिलांच्या बायोपिकमध्ये काम करण्याच्या दृष्टीने मी योग्य नाही. मी त्यांच्यासारखा दिसत नाही. त्यांच्यासारखे माझ्यामध्ये काहीच नाही. त्यामुळे त्यांच्या बायोपिकमध्ये मी काम करण्याचा संबंधच येत नाही. बायोपिकमध्ये काम करणे म्हणजे जशीच्या तशी भूमिका साकारणे आणि ही खूप आव्हानात्मक गोष्ट आहे.

# भारत आता जगातील चौथी सर्वांत मोठी अर्थव्यवस्थेचा देश

## २०३० पर्यंत 'या' देशाला मागे टाकण्याची शक्यता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



भारत जगातील चौथी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था असलेला देश झाल्याची माहिती केंद्र सरकारने दिली आहे. भारताने जपानला मागे टाकले आहे. अमेरिका ही जगातील सर्वांत मोठी अर्थव्यवस्था असून, त्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर चीन व तिसऱ्या क्रमांकावर जर्मनी हे देश आहेत. पुढील अडीच ते तीन वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था जर्मनीला मागे टाकेल, असे सरकारकडून सांगण्यात आले आहे. २०३० पर्यंत भारताचा जीडीपी म्हणजेच सकल देशांतर्गत उत्पादन ७.३ ट्रिलीयन डॉलरपर्यंत पोहोचेल. त्यामुळे भारत जर्मनीला मागे टाकून जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होईल, असा अंदाज मंगळवार, दि. ३० डिसेंबर रोजी व्यक्त करण्यात आला.

आर्थिक वर्ष २०२५-२०२६ च्या दुसऱ्या तिमाहीत भारताचा जीडीपी ८.२ टक्क्यांनी वाढला आहे. पहिल्या तिमाहीत जीडीपी ७.८ टक्के होता. तर मागील आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत जीडीपी ७.४ टक्के होता. सरकारने जारी केलेल्या परिपत्रकात म्हटले आहे, की भारताची अर्थव्यवस्था ४.१८ ट्रिलीयन डॉलरसह जपानला मागे टाकत जगातील चौथी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था झाली आहे. पुढील अडीच ते तीन वर्षांत भारताची अर्थव्यवस्था ७.३ ट्रिलीयम डॉलर होऊन २०३० पर्यंत जर्मनीला मागे टाकेल. तसेच भारताची अर्थव्यवस्था ही जगात सर्वाधिक वेगाने वाढत असल्याचे परिपत्रकात म्हटले आहे.

अमेरिका ही जगातील सर्वांत मोठी अर्थव्यवस्था असून, त्यानंतर चीन व जर्मनीचा क्रमांक लागतो. जागतिक अस्थिरता, युद्ध, व्यापार करारातील अडथळे व अमेरिकेकडून लावले जाणारे आयात शुल्क या पार्श्वभूमीवर भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेला देश झाला आहे. जीडीपीमध्ये वाढ होण्यात देशांतर्गत खरेदीत झालेल्या वाढीचे योगदान आहे. तसेच देशात बेरोजगारी कमी होत आहे. देशातून होणारी निर्यात सातत्याने वाढत आहे. महागाई नियंत्रणात असल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. वस्तू व सेवांच्या मागणीत सातत्य तसेच शहरी भागात होत असलेल्या उलाढालीने जीडीपी वाढण्यास मदत मिळाली आहे.

२०२६ मध्ये भारताचा जीडीपी किती वाढेल याबाबत जागतिक स्तरातील वित्तीय संस्थांनी अंदाज व्यक्त केले आहेत. ते अंदाज परिपत्रकात नमूद करण्यात आले आहेत, ते पुढीलप्रमाणे -

वर्ल्ड बँक - ६.५ टक्के

मूडीज - ६.४ टक्के (२०२७ मध्ये ६.५ टक्के)

इंटरनॅशनल मोनेटरी फंड - ६.२ टक्के

ऑर्गनायझेशन ऑफ इकॉनॉमिक कॉर्पोरेशन अॅण्ड डेव्हलपमेंट - ६.२ टक्के

एस अॅण्ड पी - ६.७ टक्के

फिच - ७.४ टक्के

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

पान १ वरून...

## वरवर शांतता..आतून धगधग...!

शिवसेनेच्या गोटात उपनगराध्यक्ष व स्वीकृत सदस्यांच्या निवडीसाठी, तर खा. शि. मंडळाच्या नवनिर्वाचित कार्यकारी मंडळात कार्याध्यक्ष व कार्योपाध्यक्ष या पदांच्या निवडीसाठी आता जोरदार फिल्डींग लावणे सुरू झाले आहे. हा सर्व संबंधित गटांतील निवडणूक प्रक्रियेचा अंतर्गत भाग असला, तरी दोन्ही संस्थांतील या महत्त्वपूर्ण पदांबाबत त्या-त्या गटांसह नागरिकांना मात्र कमालीची उत्सुकता लागलेली आहे. त्यामुळे दोन्हीही संस्थांतील वर्तुळात वरवर जरी शांतता दिसत असली, तरी पडद्याआड मात्र धगधग असल्याची स्थिती आहे.

नगरपालिकेत गेल्या ९ वर्षांनंतर अर्थात प्रशासकीय राजवटीनंतर निवडणूक प्रक्रिया झाली आहे. त्यानंतर आता शिवसेनेचा गट पालिकेचा कारभार पाहणार आहे. तर खा. शि. मंडळात आशीर्वाद पॅनलला निर्विवाद बहुमत मिळालेले आहे. संस्थेचा एकूणच राजकीय इतिहास पाहता बहुमत झाल्यानंतर उर्वरित संचालकांना शक्यतो सत्तास्थानी घेतले जात नाही. यावेळी इतिहासाचीच पुनरावृत्ती होते की काही ऐतिहासिक बदल होतात, याबाबत चर्चा व उत्सुकता आहे. त्यामुळे आता पालिकेसह खा. शि. मंडळातील या पदांसाठी कोण रिंगणात उतरतात आणि कोणाला संधी दिली जाते, याकडे सर्वांचेच लक्ष लागून आहे.

# पाडळसरे धरण बांधकाम वस्तुस्थितीची जनआंदोलन समितीकडून पाहणी

## कार्यकारी अभियंता य. म. कडलक यांच्याकडून जाणून घेतली सविस्तर माहिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील निम्न तापी प्रकल्प पाडळसरे धरणाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त निधी व केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या निधीसंदर्भात धरण समिती लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून पाठपुरावा करीत आहे. त्यासोबतच धरणाच्या बांधकामाची प्रगती आणि वस्तुस्थिती तसेच पुनर्वसन याबाबतची प्रत्यक्ष पाहणीही केली जात आहे. त्याचाच भाग म्हणून जनआंदोलन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी बुधवार, दि. ७ जानेवारी रोजी धरणाला प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी कार्यकारी अभियंता य. म. कडलक यांच्याकडून शासनाकडून प्राप्त निधी व खर्चाची माहिती घेत कामाची वस्तुस्थिती आंदोलनकर्त्यांनी जाणून घेतली.

जनआंदोलन समितीचे प्रमुख सुभाष चौधरी, अर्बन बँक संचालक रणजित शिंदे, महेंद्र बोरसे, महेश पाटील, देविदास देसले या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांचा यामध्ये समावेश होता. पाडळसरे धरणाचे काम गतीने व कालबद्ध पद्धतीने व्हावे तसेच बांधकामातील प्रशासनिक, तांत्रिक, आर्थिक अडचणी काय आहेत याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी बैठक घेऊन प्रत्यक्ष चर्चा करून त्यांनी माहिती घेतली. कार्यकारी अभियंता कडलक यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना सांगितले, की धरणाच्या बांधकामाच्या अनेक गोष्टी सोबत कराव्या लागतात. नुसते पाणी साठलेल्या डोळ्याने दिसते पण मिळत नाही, अशी एक परिस्थिती तयार होते. अशी विपरीत परिस्थिती होऊ नये म्हणून आपण एकाचवेळी वेळवेगळ्या पातळ्यांवर ज्या-ज्या गोष्टी शक्य आहेत त्या करीत आहोत. आम्ही त्या सगळ्या गोष्टींचा टाइमिंग कसा मॅच होईल? म्हणजे पाणीसाठा होईपर्यंत आपल्याला लोकांना पाणीही देता आले पाहिजे यादृष्टीने काम करत आहोत. प्रत्यक्ष भूसंपादन, पुनर्वसनासाठी सुद्धा प्रयत्न सुरू आहे.

धरणाच्या कामात सध्यातरी आपल्याला कुठलीही तांत्रिक अडचण नाही. नदी सहा महिने वाहत असल्याने कामाला वेळ कमी मिळतो. तरीही धरण बांधकाम पूर्ण क्षमतेने सुरू आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक मोठे गेट असलेल्या धरणांपैकी पाडळसरे एक धरण आहे. यात तांत्रिक काम असल्याने त्याला वेळ लागतो. एवढे मोठे काम अत्यंत बारकाईने करायचे आहे, असे यावेळी सांगण्यात आले. कामावर कर्मचारी खूप कमी आहेत. आज ना उद्या आम्हाला आणखी कर्मचारी मिळतील. आमचा एक माणूस तीन माणसांचे काम करतो, असे सांगत शासनाकडून प्राप्त व खर्च झालेल्या निधीची माहिती उपअभियंता भटूरकर यांनी उपस्थितीत समितीच्या पदाधिकाऱ्यांना दिली.

याप्रसंगी समितीचे प्रमुख चौधरी यांनी सविस्तरपणे समितीची भूमिका मांडली. यावेळी भरतसिंग परदेशी, एन. के. पाटील, ॲड. कुंदन साळुंखे, डॉ. संजय पवार, रहेमतुल्ला पिंजारी, सुशील भोईटे, प्रसाद चौधरी, सतीश काटे, डी. के. पाटील, प्रवीण संदानशिव, पुरुषोत्तम शेटे, ज्ञानेश्वर वारुळे, दिनेश पाटील, गुलाब पाटील, मोहन तिलक, गौतम संदानशिव, रमेश चव्हाण, भगवान कोळी, माधव पाटील, सुपडू बैसाणे, नारायण बडगुजर, संजय सोनवणे आदींसह मोठ्या संख्येने समितीचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. रणजित शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. सुनील पाटील यांनी आभार मानले.



*अमळनेर : पाडळसरे धरण बांधकाम वस्तुस्थितीची जनआंदोलन समितीतर्फे बुधवारी पाहणी करून तेथील कार्यकारी अभियंता य. म. कडलक यांच्याकडून माहिती घेण्यात आली. यावेळी झालेल्या बैठकीत बोलताना समितीचे प्रमुख सुभाष चौधरी. शेजारी अर्बन बँक संचालक रणजित शिंदे, महेंद्र बोरसे, महेश पाटील, देविदास देसले. समोर उपस्थित कार्यकर्ते व अधिकारी.*

### जनआंदोलन समितीचे मानले आभार

धरणाच्या कामात प्रशासनाला नेहमीच जनआंदोलन समितीचे विविध टप्प्यांवर सहकार्य लाभत आहे. बऱ्याच ठिकाणी जनआंदोलक प्रकल्पाविरोधात असतात. मात्र असे खूप कमी प्रकल्प आहेत ज्या ठिकाणी जनआंदोलन समिती धरणाच्या समर्थनाच्या भूमिकेत आहेत. त्यात पाडळसरे जनआंदोलन समिती सदैव धरणाच्या व काम करणाऱ्या प्रशासनाच्या पाठीशी उभी असते, ही अतिशय सकारात्मक बाब आहे. यासाठी मी शासनाच्या वतीने पाडळसरे धरण जनआंदोलन समितीचे आभार मानतो, असे कार्यकारी अभियंता कडलक यांनी सांगितले.

## पिंपळे बुद्रुक आश्रमशाळेच्या खेळाडूंचे राज्य क्रीडा स्पर्धेत यश



*अमळनेर : आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक अंतर्गत येणाऱ्या आदिवासी विकास विभाग, अमरावती यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील विजेते अनुक्रमे वासुदेव पावरा, रोशनी पावरा व राजकिरण पावरा.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक अंतर्गत येणाऱ्या आदिवासी विकास विभाग, अमरावती यांच्या वतीने २०२५-२६ या वर्षासाठी नुकत्याच राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात पिंपळे बुद्रुक (ता. अमळनेर) येथील अनुदानित आदिवासी आदर्श आश्रमशाळेच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी बजावत यश मिळविले. यात वासुदेव भीमसिंग पावरा (१९ वर्षे वयोगट) याने दुहेरी मुकुट मिळवत १०० मीटर धावणे व लांब उडी या प्रकारांत प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक मिळविले. रोशनी लक्ष्मण पावरा (१७ वर्षे वयोगट) हिने थाळीफेक प्रकारात प्रथम क्रमांक, तर राजकिरण अमाश्या पावरा (१४ वर्षे वयोगट) याने ४०० मीटर धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

सोमवार, दि. ६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विजय वाघमारे (भा.प्र.से.)- सचिव, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई) यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. डॉ. श्वेता सिंघल (भा.प्र.से.)- (विभागीय आयुक्त, अमरावती विभाग), पवनश्री प्रभावकर वैद्य (प्रधान सचिव, श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती) हे विशेष अतिथी होते. कार्यक्रमास रवींद्र ठाकरे (आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती), आशीष पाटील (भा.प्र.से.)- जिल्हाधिकारी, अमरावती), राकेश ओला (भा.पो.से.)- पोलीस आयुक्त (शहर), अमरावती), सौ. सोनिया शर्मा चांडक (भा.प्र.से.)- (आयुक्त, मनपा, अमरावती), तसेच लीना बनसोड (भा.प्र.से.)- आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक), आयुषी सिंह (भा.प्र. से.)- अप्पर आयुक्त, अमरावती), दिनकर पावरा (अप्पर आयुक्त, नाशिक) आदी उपस्थित होते. या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये नाशिक, अमरावती, ठाणे व नागपूर या चार विभागांतील खेळाडू सहभागी झालेले होते. सर्व यशस्वी खेळाडूंना पिंपळे बुद्रुक आश्रमशाळा, उच्च माध्यमिक विभागाचे मुख्य प्रशिक्षक व उपक्रमशील शिक्षक स्वप्नील पाटील व प्राथमिक शिक्षक दीपक नांद्रे यांनी उत्कृष्ट मार्गदर्शन व सातत्यपूर्ण प्रशिक्षण दिले. खेळाडूंच्या या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विद्याताई युवराज पाटील, संस्थेचे सचिव व शैक्षणिक सल्लागार युवराज पाटील, संचालक ॲड. अभिजितदादा पाटील, यावल प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी अरुण पवार तसेच सहाय्यक प्रकल्प अधिकारीप्रशांत माहुरे, पवन पाटील, संदीप पाटील, प्राथमिक मुख्याध्यापक अविनाश अहिरे, माध्यमिक मुख्याध्यापकउदय पाटील, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व क्षेत्रांतील मान्यवरांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले. या स्पर्धांमुळे आदिवासी युवकांमधील क्रीडागुणांना वाव मिळून त्यांच्यातील आत्मविश्वास व शारीरिक तंदुरुस्ती वाढीस लागेल, असे मत मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले.

# तब्बल २३ वर्षांनंतर पुन्हा ६३ माजी विद्यार्थी एकत्र

## पातोंड्यातील विद्यामंदिरात रंगला स्नेहमेळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील पातोंडा येथील श्री शिवाजी शिक्षण मंडळ संचलित श्री दत्त विद्यामंदिरात रविवार, दि. ४ जानेवारी रोजी २००१-०२ या वर्षातील बॅचचा स्नेहमेळा झाला. तब्बल २३ वर्षांनंतर शाळेत पुन्हा एकत्रित येत भावूक होत संबंधित ६३ विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. स्नेहमेळ्याची सुरूवात शाळेच्या प्रवेशद्वारात फुलांची उधळण करून करण्यात आली.

दोन दशकांनंतर पुन्हा शाळेच्या प्रांगणात पाऊल टाकताना माजी विद्यार्थी भावूक झाले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री दत्त महाराज व सरस्वती मातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर शाळेची घंटा वाजवून उपस्थितांनी राष्ट्रगीत तसेच 'खरा तो एकचि धर्म' ही प्रार्थना एकत्रितपणे म्हटली. शालेय जीवनातील शिस्त, संस्कार आणि एकोप्याची भावना पुन्हा अनुभवायला मिळाल्याचे अनेकांच्या चेहऱ्यावरून दिसून आले.

यावेळी माजी व विद्यमान शिक्षकांचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. जुन्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांसोबत संवाद साधत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यानंतर प्रत्येकाने आपल्या परिचयात सध्या ते कुठे वास्तव्यास आहेत व ते काय करतात हे सांगितले. तसेच फोटोसेशनने संपूर्ण वातावरण रंगले. हास्यविनोद आणि गप्पागोष्टींमध्ये दिवस कसा गेला, हे कुणालाच कळले नाही. याप्रसंगी दिवंगत मित्र-मैत्रिणींना उपस्थितांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. मालोजी पवार यांनी सूत्रसंचालन केले. ललित पवार यांनी आभार मानले.



*अमळनेर : तालुक्यातील पातोंडा येथील श्री शिवाजी शिक्षण मंडळ संचलित श्री दत्त मंदिरात रविवारी तब्बल २३ वर्षांनंतर स्नेहमेळ्यासाठी एकत्रित आलेले माजी विद्यार्थी.*

# सोने, चांदीच्या दरात 'हा' मोठा बदल...

## ग्राहक चक्रावले, व्यावसायिकांनीही घेतली सावध भूमिका

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : जळगाव येथील सुवर्ण बाजारपेठेत गेल्या दोन दिवसांपासून सातत्याने तेजीत असलेले सोने आणि चांदीच्या दरात बुधवार, दि. ७ जानेवारी रोजी पुन्हा मोठा बदल नोंदविण्यात आला. दोन्ही धातूंच्या दरातील मोठे चढ-उतार पाहून ग्राहकही चक्रावले. व्यावसायिकांनी सावध भूमिका घेतल्याचे दिसून आले.

सोन्याच्या दरवाढीमागे सध्या भूराजकीय तणाव हे सर्वांत मोठे कारण मानले जात आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्माण झालेल्या अस्थिरतेमुळे गुंतवणूकदारांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढीस लागली आहे. विशेषतः व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो यांना अमेरिकेने अटक केल्याच्या वृत्तानंतर जागतिक स्तरावर राजकारणात मोठी खळबळ उडाली. या घटनेमुळे अमेरिका आणि व्हेनेझुएला यांच्यातील तणाव अधिक तीव्र झाला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हेनेझुएलाने सहकार्य न केल्यास आणखी कठोर पावले उचलली जाऊ शकतात, असा इशारा दिला आहे. एवढेच नव्हे, तर त्यांनी मेक्सिको आणि कोलंबियाबाबतही कडक भूमिका घेण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे जागतिक बाजारात अनिश्चततेचे वातावरण निर्माण होऊन त्याचा थेट बाजारावर परिणाम दिसून येत आहे.

### सोने व चांदीच्या दरात नेमकी किती वाढ?

जळगाव शहरातील सुवर्ण बाजारपेठेत सोमवार, दि. ५ जानेवारी रोजी १८५४ रुपयांची वाढ झाल्याने सोने जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ४० हजार ५९५ रुपयांपर्यंत पोहोचले होते. मंगळवार, दि. ६ जानेवारी रोजी दिवसभरात आणखी ७२१ रुपयांची त्यात वाढ नोंदविली गेल्याने सोन्याचे दर जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ४१ हजार ३१६ रुपयांपर्यंत वधारले होते. बुधवार, दि. ७ जानेवारी रोजी सकाळी बाजार उघडल्यावर कोणतीही वाढ अथवा घट नोंदविण्यात आली नाही. त्यामुळे सोन्याचे दर प्रति १० ग्रॅम एक लाख ४१ हजार ३१६ रुपयांवर स्थिर राहिले. चांदीच्या दरात सोमवार, दि. ५ जानेवारी रोजी ६१८० रुपयांची वाढ झाल्याने चांदीचे दर जीएसटीसह प्रतिकिलो दोन लाख ४९ हजार २६० रुपयांपर्यंत पोहोचले होते. मंगळवार, दि. ६ जानेवारी रोजी दिवसभरात आणखी ४३२० रुपयांची वाढ नोंदविली गेल्याने चांदी जीएसटीसह प्रतिकिलो दोन लाख ५३ हजार ५८० रुपयांपर्यंत पोहोचली. तर बुधवार, दि. ७ जानेवारी रोजी सकाळी बाजार उघडल्यावर पुन्हा १८६० रुपयांची वाढ नोंदविली गेली. त्यामुळे चांदी जीएसटीसह प्रतिकिलो दोन लाख ५५ हजार ४४० रुपयांपर्यंत वधारली.

# मुलींनो, सावित्रीबाई, रमाबाई, डॉ. रखमाबाईंचा आदर्श घ्या

## ॲड. रंजना पवार-गवांदे यांचे सावित्रीबाई महिला महोत्सवात आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महिलांवरील अत्याचार थांबवायचे असतील, तर पुरुषांच्या नजरा सुधारण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. त्यासाठी सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, डॉ. रखमाबाई, कमलाताई सोहनी यांसारख्या थोर महिलांचे कर्तृत्व मुलींनी समजावून घेणे गरजेचे आहे, असे आवाहन ॲड. रंजना पवार-गवांदे यांनी केले. अमळनेर पालिकेचा महिला व बालकल्याण विभाग व अमळनेर महिला मंच यांच्या संयुक्त विद्यमाने २ ते ५ जानेवारी २०२६ दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात आयोजित सावित्रीबाई महिला महोत्सवात 'अंधश्रद्धा आणि महिला' या विषयावर त्या बोलत होत्या.

ॲड. पवार-गवांदे म्हणाल्या, की अंधश्रद्धा महिलेच्या जन्मापासून सुरू होते. तिचा जन्म अस्वागतार्ह मानला जात असल्याने मुलींचा जन्मदर कमी होतो. त्यामुळेच आजच्या मुलांना मुली मिळत नाही. याची कारणे पाहिली तर मुलींची असुरक्षितता, लग्नात केला जाणारा प्रचंड खर्च ही प्रामुख्याने म्हणता येतील. मात्र मुलींनी देखील आता पालकांच्या जबाबदाऱ्या लक्षात घेतल्या पाहिजेत. मुलगा व मुलगी समानता ठेवली पाहिजे. समाजात व्रत-वैकल्ये, उपवास याबाबतही अंधश्रद्धा आहे. महिलांनी सक्षम होण्यासाठी उपवास नव्हे, तर सकस आहार घेतला पाहिजे. ज्या सावित्रीबाईंनी विद्रोहाचे काम करून महिलेला आत्मविश्वास देऊन जगण्याचे बळ दिले. पंडिता रमाबाई यांनी संस्कृत शिकल्या म्हणून त्यांच्या कुटुंबावर बहिष्कार टाकणाऱ्या समाजाविरोधात बंड पुकारले, बालवयात लग्न लावले म्हणून अडाणी व्यक्तीबरोबर नांदायला जायला नकार देऊन डॉ. रखमाबाई यांनी न्यायालयाच्या आदेशाने त्याकाळी पतीला पोटगी दिली. पहिल्या महिला शास्त्रज्ञ कमलाबाई सोहनी, पहिल्या महिला वकील कॉर्नेलीया सोराब यासारख्या महिलांना संघर्ष करावा लागला. त्यांचा आजच्या महिलांनी आदर्श घ्यायला हवा.

व्यासपीठावर महिला मंचच्या अध्यक्षा डॉ. अपर्णा मुठे, कांचन शहा, तिलोत्तमा पाटील, विद्या हजारे, करुणा सोनार, सरोज भांडारकर, वसुंधरा लांडगे, माधुरी पाटील आदी यावेळी उपस्थित होत्या.



*अमळनेर : पालिकेचा महिला व बालकल्याण विभाग व अमळनेर महिला मंच यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात आयोजित सावित्रीबाई महिला महोत्सवात 'अंधश्रद्धा आणि महिला' या विषयावर बोलताना ॲड. रंजना पवार-गवांदे. व्यासपीठावर महिला मंचच्या अध्यक्षा डॉ. अपर्णा मुठे, कांचन शहा, तिलोत्तमा पाटील, विद्या हजारे, करुणा सोनार, सरोज भांडारकर, वसुंधरा लांडगे, माधुरी पाटील.*

# दातांच्या मध्यभागी कीड लागल्यास काय कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दातांना कीड लागणे ही एक सामान्य समस्या आहे. ओरल हायजिन खराब असणे, खाण्या-पिण्यातील अनियमितता इतर काही कारणामुळे दातांना कीड लागते. दातांच्या समस्येमुळे फक्त दात किडत नाहीत तर वेदनाही जाणवतात. दातांमध्ये वेदना जाणवणे अनेकदा असह्य होते. दातांतील कीड काढून टाकण्यासाठी तुम्ही काही सोपे उपाय करू शकता. ज्यामुळे कॅव्हिटीज दूर हटवण्यास मदत होऊन वेदनांपासूनही आराम मिळेल. नारळाचे तेल आणि लवंग दातांच्या समस्या टाळण्यासाठी एक प्रभावी उपाय आहे. नारळाच्या तेलाचा वापर करून ऑईल पुलिंग केल्यास दात स्वच्छ होण्यास मदत होते. तोंडातील बॅक्टेरियाज कमी होतात. यातील नॅच्युरल एंटीमायक्रोबियल गुणधर्म दातांना चांगला परिणाम दर्शवतात.

### दातांवर नारळाचे तेल आणि लवंगचा वापर कसा करावा?

हा उपाय घरच्या घरी करण्यासाठी २ चमचे नारळाच्या तेलात २ ते ३ थेंब लवंगचे तेल घाला. एका स्वच्छ वाटीत नारळाचे तेल काढून घ्या. यात लवंगचे तेल व्यवस्थित मिसळा. हे मिश्रण दात आणि हिरड्यांना लावा. कमीत कमी ५ ते १० मिनिटे तसेच लावून ठेवा. त्यानंतर तोंड स्वच्छ करून पाण्याने गुळण्या करा. ही



प्रक्रिया दिवसभरातून २ वेळा करा. ज्यामुळे दातांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होईल. नारळाच्या तेलात अँटी बॅक्टेरिअल गुण असतात. ज्यामुळे तोंडातील बॅक्टेरिया मारण्यास मदत होते. लवंगाचे तेल वेदना निवारक आणि अँटी सेप्टीक गुणांनी परिपूर्ण असते. ज्यामुळे दातांतील संक्रमण कमी होण्यास मदत होते. लवंगात अँटी सेप्टीक गुण असतात. ज्यामुळे दातांतील संक्रमण कमी होण्यास मदत होते.

### हा उपाय करताना सावधगिरी बाळगा

हा उपाय करताना लक्षात घ्या, की तुम्हाला नारळाचे तेल किंवा लवंगच्या तेलाची तुम्हाला कसलीही ॲलर्जी होणार नाही. दातांमध्ये वेदना जाणवत असतील तर नेहमीच वैद्यकीय हेल्प घ्या. दातांमध्ये कीड लागणे हे ओरल हायजिनशी संबंधित आहे. रेग्युलर ब्रश करणे, फ्लोसिंग करणे, यामुळे समस्या टाळण्यास मदत होते.




# श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज जन्म आख्यान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रीगुरू महाराजांचा जन्मसोहळा कसा असेल याचे मनन किंवा चिंतन करणे हे फार शुभदायी असते. आपणही आपल्या मनाला त्या काळात नेऊन श्रीगरू महाराजांचा जन्मसोहळा अनुभवूया. पौष मासाला सुरूवात झाली होती. थंडीचे दिवस असल्याने गावात धावपळ तशी कमी असली, तरी सकाळपासून अंबामातेच्या माहेरी वाड्यात लगबग सुरू झाली.

आपले पतीराज माधवराव यांच्या वाड्यापासून माहेर तसे थोड्याच अंतरावर. अंबामातेला आता ९ महिने सरले होते. तसे हे ९ महिने शुभ संचिताने पूर्णत्वास गेले होते. परमात्म्याचे गुरुस्वरूप गर्भगृहात असल्याने मातेच्या मुखावर, देहावर तेज दिवसेंदिवस वाढत होते. घरातील ज्येष्ठ मंडळी ही सुखामध्ये वावरत होती. सर्व काही व्यवस्थित आहे याचाच आनंद आपल्या मनाच्या धर्माप्रमाणे वावरत होता. सकाळपासूनच अंबामातेस आज वेगळेपण जाणवू लागले. जगात उद्धारासाठी कधी एकदा या भूमीवर ॐ म्हणतोय आणि सूर्यदेव कधी एकदा सहस्त्रचक्रावर विराजमान होतात या उत्कंठेने श्रीस्वरूप मातेच्या नाभीचक्रामध्ये हालचाल करू लागले. अंबामातेने तसे आपल्या मातोश्रींना सांगितले. अंबामातेचे पहिले बाळंतपण असल्याने सर्व सुखरूप होऊ दे, या सदिच्छेने माता-पिता आणि घरातील महिला मंडळ धावपळ करू



लागल्या. अंबामातेचे बाळंतपणाचे गृह सजविण्यात आले. बाळंतपणातील कार्यासाठी अनुभवी ज्येष्ठ महिला तयारी करू लागल्या.
सूर्य डोक्यावर यायला आणखी एक प्रहर होता. तोपर्यंत बाहेरील बाजूस चुलीवर पाण्याने भरून मोठे घंगाळ ठेवले गेले. त्यावेळच्या पद्धतीनुसार जुनी साडी आणि उबदार कपडेलत्ते याची तयारी करून ठेवली गेली. उबदार गृह हवे म्हणून चुलीच्या निखाऱ्यावर सुंगधी द्रव (गुगुळ, अगुरू, चंदन) घातली असल्याने सर्व वातावरण गंधीत झाले. त्या गृहाचे दार बंद करण्यात आले. बाहेरील बाजूस ज्येष्ठ मंडळी येरझाऱ्या घालू लागली. सूर्य माथ्यावर येण्यासाठी अगदी थोडाच अवकाश होता आणि दार उघडले गेले. पण रडण्याचा आवाज नव्हता. दारातून काय सांगणे होते याकडे सर्व मंडळींचे उत्कंठावर्धक ध्यान होते. ती महिला आली आणि आनंदाने सांगू लागली. पुत्ररत्न झाले आहे. सर्व सुखरूप आहे.

आपली मुलगी, सून, बहीण आंबा आई झाली, याचे सर्वांना कौतुक करण्यास सुरू केले. श्रीस्वरूपाचे जन्मोत्सव साजरे करण्याचे भाग्य परोक्ष आणि अपरोक्ष मिळाले असले, तरी ते महतभाग्यच होते. यामध्ये बाळाच्या ओंकारचा नाद जन्मप्रसंगी उपस्थित असलेल्या मातृकाशक्तींना योगीनींना मिळाला. या जगतातील महामाया आणि ओंकारस्वरूप परमात्मा याचे वेगळे स्वरूप भूतली साजरे झाले. ते दैवी, तेजस्वरूप बाळ पुढे 'गुरुस्वरूप' म्हणून किती जगतउद्धार करेल याची त्याप्रसंगी कोणालाच कल्पनाही नसेल. पण त्या अव्यय गुरुस्वरूपा अवताराचे साक्षी होणे यातच सकल सुखाचा वर्षाव देहावरच्या रोमारोमात घेणे हाच सुखसोहळा.

श्रीगुरू अवताराचे महत्त्व भूतली त्यावेळी ज्ञात नसले तरी देवलोकी मंगलवाद्याने आणि पुष्पवृष्टी होऊन सकल देवगणांनी हा उत्सव साजरा केला असेल. 'यत तत' म्हणजे श्रीगुरूंचे- ज्यांचे सत्यस्वरूप परमात्मास्वरूप म्हणून 'यती' - पंचभूतांच्या - तत्त्वाच्या आधारे ज्ञानकार्य करत राहणे- हेच मानवजातीच्या उद्धाराचे महतकार्य सूर्यसाक्षीने होत असते कारण सूर्यदेव या जगतसंसाराचा सगुण आत्मा आहे. श्रीगुरू स्वरूप हे आत्मकारक आहे म्हणून नित्य, शाश्वत, चिरंतन परमसुख आहे. वेदातील शृतीनुसार मानवजीव फक्त स्व-सुखासाठी जगत असतो. (ज्या गोष्टीने आनंद मिळतो असे भौतिक सुख, पत्नी, मुले, पैसा, खाणे-पिणे, मनाप्रमाणे वागणे) हे सुख बाह्यदृष्टीने जास्त, कर्मेद्रिय जाणिवेने हेच ते असे वाटत राहत असते. सद्गुरूंच्या जन्माच्या काही कथा आहेत. त्यामध्ये असे दाखले आहेत, की श्रीजन्मप्रसंगी जे-जे जवळ होते त्या सर्वांची या भवसागरातून (चिंता, क्लेश, शारीरिक दुःखे) मुक्तता झाली आहे. प्रत्यक्ष परमात्मास्वरूप भूतलावर येताना उपस्थित असण्याचेही महतभाग्य असते.
श्रीगुरू महाराज या स्वसुखाचा अर्थ आध्यात्मिक ज्ञानाने सांगून जीव उन्नतीसाठी करून घेत असतात. श्रीपादप्रभूंच्या २४९८ यामधील २ हे द्वंद अर्थाने असले, तरी 'दुसरा' अर्थ- धर्मव्यवहाराचा आहे. जे आहे त्याच्या विपरीत-जे शुद्ध, सत्य असा जो मार्ग तो श्रीगुरूंसमोर आणून ठेवतात. हेच आपल्या दैवीभूमीचे तेज आहे.

**॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ॥**
**॥ दिगंबरा दिगंबरा श्रीमद नृसिंह सरस्वती गुरूमहाराज दिगंबरा ॥**

## श्रीकृष्ण श्रीदत्त प्रभूंचे अभिन्न अंग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अनेक जन्मांतील केलेल्या पाप-पुण्याचे फळ क्षीण स्थितीत असेल, तर पुण्य महाविशेषमध्ये जमा होते. यावेळी श्रीदत्त प्रभूंची भक्ती प्राप्त होते. अशा भक्ताला सर्वसिद्धी प्राप्त होतात. ब्रह्मदेवाने लिहिलेल्या प्रारब्धास कोणी बदलू शकत नाहीत. परंतु श्रीदत्त प्रभूंच्या भक्तांच्या बाबतीत मात्र श्री दत्त ब्रह्मदेवाला आदेश देऊ शकतात. जीवाच्या शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक स्थितीला भगवान विष्णू कारणीभूत असतात. अपरिपक्व अवस्थेत असताना महायोग शक्तीने जीवात प्रवेश केल्यास शरीर, मन, बुद्धी त्या शक्तीस सांभाळू शकत नाहीत आणि अग्नीज्वालेचा दाह झाल्यासारखे वाटते. जीवाचे जीवनमान सुरळीत चालण्यासाठी भगवान विष्णू आपणास सहाय्य करतात, ते प्रत्येकाच्या कर्मानुसार. श्रीकृष्ण श्रीदत्त प्रभूंचे अभिन्न अंग आहेत. भगवान श्रीकृष्ण यांनी गोवर्धन पर्वत अंगुलीवर धारण केला होता, हे सर्वांना ज्ञात आहेच. गोकुळातील साऱ्या गोपी आणि गोप पूर्व जन्मातील महान महान ऋषी होते. त्यांनी रचलेले महान ग्रंथ पर्वत रूपाने अवतरीत झाले होते. या महान ग्रंथांचे विभेदन होऊन त्यातून प्रचंड महायोग शक्ती निघते तेव्हा जीवास खूपच हलके हलके वाटते. या सूक्ष्मस्थितीत



जीवाला महायोगानंद मिळतो. हा मिळविण्यासाठी कठीण तपश्चर्या लागते. भगवान श्रीकृष्ण भगवान आपल्या भक्तांचा, आश्रितांचा संपूर्ण भार स्वतः पेलून घेतात. त्यांचे ग्रंथी विभेदन करून त्यांना शक्ती प्रदान करतात. हे आध्यात्मिक रहस्य आहे. बौद्धीक दृष्टीने पाहिल्यास श्रीकृष्ण गोवर्धन पर्वत उचलून सर्वांचे रक्षण करीत आहेत, असे वाटते. श्रीदत्त प्रभूंचा तो संकल्पच होता. परिस्थितीला बदलायचे, परिणाम क्रमाला शीघ्रपणे करण्याचे आदेश ते भगवान विष्णूंना देत असत. या प्रक्रियेत भक्तांच्या प्रारब्धामुळे मार्गात येणाऱ्या अडचणी, त्यांचे अनुभव त्यांच्या नकळत त्यांना सुसह्य होत असत. श्रीपाद श्रीवल्लभ आपल्या भारी भक्कम विद्यांवर भक्तांचा भार वाहतात. श्रीपाद प्रभू किती दयाळू आणि कारूण्य मूर्ती आहेत.

## भक्तवत्सल दत्त महाराज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


श्रीनृसिंह सरस्वती स्वामी दत्त महाराज हे अत्यंत शांत आणि सौम्य अशा स्वभाव प्रकृतीचे. तेज हे कधी शीतल असत नाही. मात्र महाराजांबाबत हे निश्चित आहे. भक्तांना सांभाळून घेणारे आणि अभिष्ट देणारे महाराज कधी क्रोधीत झाले असतील का? किंवा होत असतील का? संपूर्ण गुरुचरित्रात केवळ एका गोष्टीकरिता त्यांचा हा क्रोध दिसून येतो. भक्तवत्सल आणि भक्ताभिमानी या बिरुदांना महाराज नित्य सांभाळतात तेव्हा दत्तभक्तांना त्रास देणाऱ्या अभक्तांना या क्रोधाला सामोरे जावे लागते. अनेक उदाहरणे गुरुचरित्रात आणि दत्त महात्म्यात आली आहेत.

गुरुचरित्रात याची सुरूवात वल्लभेशाच्या कथेपासून होते. वल्लभेशाला चोरांनी मारले मात्र तत्काळ श्रीपाद श्रीवल्लभ दत्त महाराज एका हातात त्रिशूल आणि एका हातात खट्वांग घेऊन प्रकट झाले. अत्यंत आक्रमक आणि क्रोधाने व्याप्त. चोरांनी विचारही केला नसेल तोवर त्यांचा वध झाला. तिसरा चोर मात्र अतिभाग्यवान, पटकन पुढे होत महाराजांचे पाय धरले आणि क्षमायाचना केली. शरणागत वत्सल अशा दत्त महाराजांनी त्याच्या नमस्काराला मान देत जीवदान दिले.

शिरोळच्या ब्राह्मण स्त्रीला त्रास देणाऱ्या पिशाच्चाला महाराज रागावून म्हणाले, की **कस्त्वं पिशाचरूपेण सतीं खेदयसे ऽ धम ॥** अरे अधमा (नीचा), त्या सतीला कष्ट देणारा तू कोण आहेस? (व्दिसाहस्री). गाणगापूरला एका ओस घरापाशी एक ब्रह्मराक्षस राहत असे. महाक्रूर या शब्दात त्याचे वर्णन आहे. मनुष्यमात्रांना आहार मानणारा तो महाराज तेथे जाताच प्रकट झाला. **कर जोडोनि श्रीगुरुसी । विनवीतसे भक्तीसी । स्वामी माते तारी दीनासी ॥** महाराजांच्या क्रोधाला जाणणारा तो आधीच शरण येऊन मुक्ती प्राप्त करता झाला.

दोन मदोन्मत्त ब्राह्मण महाराजांपाशी वादविवाद करण्यासाठी आले. दत्त महाराजांना ओळखू शकले नाहीत आणि वादविवाद करा म्हणू लागले. मात्र महाराज त्यांच्या वादविवादाने क्रोधीत झाले नाहीत तर त्रिविक्रम यतिंना पायी चालवून हे दोघे पालखीत बसून आले. **यतीश्वरा चालवूनी । आपण बैसले सुखासनी ॥**

खेरीज अनेक ब्राह्मणाची निंदा केली. तेव्हा या अपराधाबद्दल महाराजांनी या मदोन्मत्त विप्राना शिक्षा केली. त्रिविक्रम यती हे महाराजांचे परमभक्त होते तेव्हा त्यांना दिलेला त्रास महाराजांना कसा चालेल?



दत्त महात्म्यात देखील अनेक प्रसंगांत महाराजांचे भक्त वत्सलत्व दिसून येते. आयु राजा हा महाराजांचा भक्त, त्याच्या मुलाकरिता अर्थात नहुषाकरिता महाराज स्वतः मूळ स्वरूपात प्राण रक्षणार्थ हजर होते. दत्त महाराज हे आपल्या भक्तांचा नित्य सांभाळ करतात. भक्त म्हणून आश्वस्त होऊन हाक मारणे हे आपले कर्तव्य आहे.

## अवधूत म्हणजे नक्की काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान दत्तात्रय, गोरखनाथ, नृसिंह, सरस्वती या सगळ्यांना अवधूत म्हणतात. पण अवधूत म्हणजे नक्की काय हो? ' अवधूत ' या शब्दाचा अर्थ आहे अवधूत. म्हणजे ज्याने सगळे प्रकृतीचे विकार धुऊन टाकले. मन संपूर्ण निर्मळ असा अवधूत. अवधूत म्हणजे फक्त साधू नाही, हा तो परम संन्यासी आहे. जो जाती-धर्माच्या बंधनाच्या पलीकडे आहे. देहभान विसरलेला योगी संसाराच्या मायेतून मुक्त सतत आत्मचिंतन करण्यात मग्न तो अवधूत. दिशांनाच वस्त्र मांडणारा संपूर्ण विरक्त. भगवान दत्तात्रय यांनी अवधूत गीता या पवित्र ग्रंथाची रचना केली. हा अद्वैत तत्त्वज्ञानाचा महान ग्रंथ आहे. दत्तगुरूंनी २४ गुरु केले. निसर्गातील प्रत्येक गोष्टीतून



त्यांनी ज्ञान घेतले. हाच खरा अवधूत भाव. अवधूत म्हणजे आकाशासारखा विरक्त आणि बंधनातीत असतो ज्याला जगाच्या मोहमायांची परवा नसते. थोडक्यात अवधूत म्हणजे एक अशी उच्च अध्यात्मिक अवस्था जेथे मनुष्य सर्व भौतिक जगाच्या बंधनाच्या पलीकडे जाऊन आत्मतत्वाशी एकरूप होतो. म्हणूनच आपण म्हणतो अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त.

## भगवंताचे प्रेम कसे उत्पन्न होते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चमत्कार करता आले म्हणजे ब्रह्मज्ञान झाले असे नाही म्हणता येणार. संतांचे दर्शन झाले, पण त्याच्या आजूबाजूचे लोक पाहिले तर वाईट दिसतात. आपण दवाखाना पाहायला गेलो तर निरोगी लोक आपल्याला तेथे कसे दिसतील? आमची प्रपंचाची नड संतांनी दूर करावी, हे म्हणणे चुकीचे नाही का? ती दूर करण्याकरिता प्रापंचिकाकडे जावे, संतांकडे नव्हे. आता दुखणे बरे व्हावे म्हणून जरी ' राम राम ' म्हटले, तरीसुद्धा ते वाया जात नाही. सत्पुरुषांचे अत्यंत उपकार असतील तर रोगाचे निदान काय आहे ते त्यांनी शोधून काढले. आपल्याला हवेपणाचा रोग झाला आहे! हवे नको पण जेथे आहे तेथे समाधान नाही हे खास, आपल्या भजन-पूजनाचा हेतू कोणता असेल? तो समजून भजन-पूजन करा म्हणजे झाले. आज भगवंत हवा असे म्हणणारे लोक थोडेच आहेत आणि ज्यांना भगवंत हवा असतो तो भगवंतासाठी नको असतो तो त्यांच्या प्रपंचासाठी हवा असतो. ज्याला भगवंताकरताच भगवंत हवा, त्याला समाधान खास मिळेल. त्याला कशाचीही अट नाही. त्याला वयाची मर्यादा नाही, विद्येची नाही, बुद्धीची नाही, पैशाची नाही, कशाचीही नाही; तळमळीची मर्यादा आहे.
खरोखर परमार्थ हा अनुमानाचा नाही. आपण नुसते बोलतो, कृती काहीच करीत नाही, म्हणून तो आपल्या आवाक्याबाहेर आहे असे आपल्याला वाटते. न करायला सबबी पुष्कळ सांगता येतात. अर्जुनाला भगवंतांनी युद्धाला उभा राहा म्हणून सांगितले. अर्जुन सबबी सांगू लागला. देवाला फार वाईट वाटले. देहबुद्धीमुळे, अभिमानामुळे, भगवंताच्या आज्ञेला सबबी येतात. व्यवहारात सबबी सांगण्याची आम्हाला फार सवय झाली आहे. प्रयागला मुलगी आजारी पडली तर मनुष्य लगेच तिकडे जातो, आणि काशीस जायचे तर, योग येत नाही असे म्हणतो! आज्ञेला सबब सांगणे हे मोठे पाप आहे. एखाद्या सावकाराला सांगितले की तुझ्याजवळचे सर्व काही देऊन टाक, तर तो कदाचित देईलही; पण ' मी दिले, ' ही आठवण नाही जाणार त्याची. जो द्यायला सांगतो तोच दाता असतो, हे तो विसरतो.

व्यापाऱ्याला स्वप्न व्यापाराचेच पडते, त्याप्रमाणे, आपण ज्याचा सहवास करावा त्याचे प्रेम येते. भगवंताविषयी प्रेम कसे उत्पन्न होईल ते पाहावे. सहवासाने, निश्चयाने, किंवा आपलेपणा विसरल्याने, परमेश्वराचे प्रेम येते. पुष्कळ दिवस एका घरात राहिल्याने त्या घराविषयी नाही का आपल्याला प्रेम येत ? मुंबईत राहणाऱ्याला मुंबई आवडते, याचे कारण सहवास. गांजा प्रथम ओढताना जरी ओकारी आली, तरी सवयीने त्याचे प्रेम येऊ शकते. नापसंत नवऱ्याशी जरी लग्न झाले, तरी मुलगी निश्चयाने त्याच्यावर प्रेम करायला शिकते; म्हणजेच, प्रेम निश्चयाने येऊ शकते. राम आपल्या हृदयात आहे ही भावना ठेवू या. ' रामाहून मी वेगळा नाही, आणि तो माझ्या हृदयात आहे, ' असा दृढनिश्चय करून ही भावना वाढविली पाहिजे.
आपले प्रेम प्रपंची लावले आहे, ते रामनामी लावायला पाहिजे.

## श्री स्वामी समर्थ..!

शुभं करोति कल्याणम आरोग्यं धनसंपदा ।
शत्रुबुद्धि विनाशाय दीपज्योति नमोऽस्तुते ।
दिव्या दिव्या दिपत्कार कानी कुंडले मोतीहार ।
दिव्याला पाहून नमस्कार ॥१॥
दिवा लावला देवांपाशी, उजेड पडला तुळशीपाशी ।
माझा नमस्कार सर्व देवांपाशी ॥२॥
ये गे लक्ष्मी बैस गे बाजे, आमुचे घर तुला सारे ।
तिळाचे तेल कापसाची वात, दिवा जळो मध्यान्हात ।
घरातली इडापिडा बाहेर जावो बाहेरची लक्ष्मी घरात येवो ।
घरच्या सर्वांना उदंड आयुष्य लाभो ॥३॥
दीपज्योतिः परब्रह्म दीपज्योतिः जनार्दन ।
दीपो हरतु मे पापं संध्यादीप नमोऽस्तुते ॥४॥
अधिराजा महाराजा वनराजा वनस्पति ।
इष्टदर्शनं इष्टान्नं शत्रूणांच पराभवम् ।
मुले तो ब्रह्मरुपाय मध्ये तो विष्णुरुपिणः ।
अग्रतः शिवरुपाय अश्वत्थाय नमो नमः ॥५॥

**श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ..!**
**ओम नमः शिवाय..! हर हर महादेव..!**
**श्री स्वामी समर्थ महाराज की जय...!**

## जय गुरू आदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**१) निर्गुण म्हणजे कोण?**
निर्गुण म्हणजे ज्याला कुठलाही गुण नाही. जसे की हास्य, दुःख, सुख, आनंद, निद्रा या उपाधी हे नकारात्मक आणि सकारात्मक कुठलेही गुण ज्याच्या अंतरी नाही त्याला निर्गुण म्हणावे. निर्गुण हे स्वरूप आहे आणि निर्गुण हा परमेश्वर आहे. निर्गुण हेच तत्त्व आहे जे अनंतरूपात व्यापक आहे.

**२) सगुण साकार म्हणजे कोण?**
जो सहस्त्र रूपांनी, सहस्त्र गुणांनी आणि हजारो लक्षावधी भावांनी नटलेला आहे, ज्याच्यामध्ये सहस्त्र गुण आहेत त्याला सगुण म्हणतात. जो सहस्त्र रूपे धारण करू शकतो त्याला सगुन म्हणतात.

**३) निराकार म्हणजे कोण?**
ज्याला कुठलाही आकार नाही त्याला निराकार म्हणतात.

**४) निर्विकार म्हणजे कोण?**
ज्याला कुठलेही विकार नाहीत, काम, क्रोध, मोह, माया, लोभ, स्वार्थ, गर्व, अहंकार, झोप, तहान, भूक इत्यादी कुठल्याही उपाधी ज्याच्या अंतरी नाहीत, कुठलेही विकार ज्याला शिवत नाही त्याला निर्विकार म्हणतात.

**५) निर्भेद म्हणजे कोण?**
ज्याच्या आंतरिक कुठलाही भेद नाही, कुणाविषयी द्वैतभाव, दुजाभाव नाही तो आणि मी एकच आहे हा समरसभाव ज्याच्या अंतरी आहे त्याला निर्भेद म्हणावे.

**६) अलक्ष म्हणजे कोण?**
ज्याच्याकडे कोणाचेही लक्ष जात नाही, असा निर्गुण, निराकार परमात्मा ज्याच्याकडे आपल्याला लक्ष देऊन पाहणे आहे, असा अलक्ष निर्गुण, निराकार परमेश्वर त्याला अलक्ष म्हणतात.

**७) निरंजन म्हणजे कोण?**
निर म्हणजे नाही. अंजन म्हणजे काजळ. ज्याप्रमाणे बिनाकाजळ घालताही जो सर्व काही पाहू शकतो, सर्व काही ज्याला स्पष्टपणे दिसते अर्थातच निरंजन म्हणजे जो सर्वत्र पाहू शकतो. त्याच्या प्रकाशाने विश्व प्रकाशित होते. त्याच्यापासून सृष्टीचा आरंभ आहे. परंतु त्याला कुठलाही आरंभ नाही, कुठलाही जन्म नाही, त्याच्यापासून जन्म-मृत्यू आहेत. परंतु त्याला स्वतःला जन्म-मृत्यू नाही असा निर्गुण, निराकार, निर्विकार, निरंजन, अलक्ष परमेश्वर त्याला निरंजन म्हटले गेले.

**८) आदेश म्हणजे काय?**
आ म्हणजे आत्मा. दे म्हणजे देवो. श म्हणजे शिव. आत्मा हाच देव आहे. हा शिव आहे याचे स्मरण करून देणारा हा आदेश शब्द.

**९) गुरू म्हणजे कोण?**
गु म्हणजे अंधकार आणि रु म्हणजे प्रकाश. जो अंधारातून अंधकारातून प्रकाशाकडे नेतो, मायेच्या अज्ञानातून मुढतेमधून निरंजन, निर्विकार परमेश्वराच्या ज्ञानाकडे, प्रकाशाकडे, गूढतेकडे घेऊन जातो त्याला गुरू म्हणावे. तसेच सतगुरू म्हणजे भगवंताचे सत्य गृह्य रूप दाखविणारे सद्गुरू होय.

**१०) प्रपंच माया म्हणजे काय?**
आपण अनेकदा म्हणतो, की अध्यात्म करण्यासाठी संन्यास घेणे आवश्यक आहे किंवा प्रपंच त्यागणे आवश्यक आहे. प्रपंच माया त्यागणे म्हणजे प्रपंच त्यागणे असे आपण मानून घेतो. परंतु संसार, प्रपंच म्हणजे सारासार ही सृष्टी आणि या सृष्टीमध्ये असणारा भोवतालचा सर्व पसारा. हा पसारा आपण जन्माला येण्यापूर्वीही येथेच होता, मेल्यानंतरही येथेच राहणार, येतानाही यातील काही आपण घेऊन आलो नाही व जातानाही काही घेऊन जाणार नाही. परंतु जन्माला आल्यानंतर येथे असणारा या संसारिक गोष्टींवर भूलित होऊन हे माझे, ते माझे, आधी मोह, लोभ, स्वार्थ, अहं बाळगणे हे विकार ज्याच्यामधून उत्पन्न होतात त्याला माया म्हटले गेलेले आहे. या सर्वांची उत्पत्ती ही वासनेमधून होते. वासना बुद्धीशी समरस झाली आणि बुद्धीवासनेशी समरस झाली की मग मायेचा खेळ चालू होतो. बुद्धी दुर्बुद्धीहीन होऊन जाते आणि वासनेच्या मागे-मागे प्रत्येक गोष्टीचा लोभ मोह धरू लागते. परंतु अंतक्षणी ज्याप्रमाणे वांजवृक्षाला कितीही पाणी घातले तरी त्याला फळे लागत नाही त्याप्रमाणे या सृष्टीत कशाचा जरी मोह धरला किंवा कुणासाठी एखाद्या व्यक्तीसाठी किंवा एखाद्या गोष्टीसाठी कितीही झटले तरी अंतक्षणी शेवटी एकट्यालाच आपले कर्म सोबत घेऊन जाणे आहे, हे जीवनाचे मूळ मर्म आहे. त्या वांजवृक्षासारखे प्रपंच वृक्षाला कधीही फळप्राप्त होत नाहीत. अध्यात्म करण्यासाठी प्रपंच त्यागणे नव्हे; तर प्रपंच माया त्यागणे आवश्यक आहे. प्रपंच आपल्या जागी स्थिर आहे. परंतु आपण त्या प्रपंचाच्या अवतीभवती मोह व लोभ धारण करून फिरत आहोत. ही फिरती लोभ व मोहाची माया, विकारांची माया अर्थातच विकार त्याने अर्थात संसारमाया त्यागणे होय. यासाठी तुम्हाला प्रपंच सोडणे नाही. प्रपंचामध्ये राहून या सर्व गोष्टींचा लोभ, मोह त्यागून देणे अर्थात प्रपंच माया त्यागणे आहे. दिवसभरातील २४ तासांत एक क्षण अर्थात ज्याला ज्याप्रमाणे वेळ भेटतो त्याप्रमाणे भगवंताशी समरस होण्यासाठी वेळ देणे या प्रपंच मायेपासून बाजूला होणे व एकाग्र चित्ताने फक्त भगवंताचे सद्गुरूंनी दिलेल्या बीजमंत्राचे स्मरण करणे अर्थातच अध्यात्म सेवा करणे.

**११) विरक्ती म्हणजेच कशातही असक्त**
नाम हेच परमेश्वराची भेट करवून देईल. गंगेचा किंवा इतर कोणत्याही नद्यांचा उगम जर आपण पाहिला, तर एक-एक थेंब स्वच्छ पाणी तेथून खाली पडत असलेले आपल्याला दिसेल. पूर्वपुण्याईमुळे आयुष्यात परमार्थाचा उगमही असाच लहान पण अगदी स्वच्छ असतो. पुढे त्या स्वच्छ झऱ्याचे नदीत रूपांतर होते आणि अनेक ठिकाणांहून वाहत आल्याने तिचे पाणीही काहीसे गढूळ बनते. तसेच आपले जीवनही व्यवहारातील बऱ्या-वाईट गोष्टींच्या सान्निध्यामुळे पुढे गढूळ बनत जाते. परंतु ज्याप्रमाणे पाण्याला तुरटी लावली म्हणजे पाणी स्वच्छ होऊन सर्व गाळ तळाशी राहतो, त्याप्रमाणे कोणतेही काम करताना नाम घेतले तर त्या कर्माचे गुणदोष तळाशी बसून, वर निर्मळ जीवनाचा प्रत्यय येतो. कोणीही दाढीवाला साधू येऊन सांगू लागला, की परमार्थ असा आहे, तसा आहे, तर तुम्ही खुशाल छातीवर हात ठेवून सांगा, की नामाशिवाय परमार्थच नाही. कर्म करताना नाम घेऊन समाधानात राहणे हाच खरा परमार्थ. भगवंताचे प्रेम यायला, त्याच्याबद्दल आपलेपणा वाटायला, नामासारखे साधन नाही. आपलेपणाचे प्रेम किती असते पाहा. एक मुलगा आईजवळ राहत होता. पुढे त्याचे लग्न झाले. त्याने बायको आपली मानली, तिच्याबद्दल त्याला प्रेम उत्पन्न झाले. पुढे ती जरा कृश झाली. त्याला वाटले, ही शहाणी आहे, बोलत नाही, परंतु हिला आपल्या आईचा जाच असला पाहिजे. म्हणून तो वेगळा निघाला. आपले म्हटल्याने केवढे प्रेम उत्पन्न होते पाहा. तेव्हा परमेश्वर आपलासा होण्यासाठी नामाच्या योगाने त्याच्यापाशी आपलेपणा निर्माण केला पाहिजे. रामाचे प्रेम हे त्याच्या नामाच्या संगतीनेच येऊ शकेल. नुसते पुस्तक वाचून परमार्थ सांगणारे भेटतील, पण आचरणात आणून सांगणारे विरळाच. किती, किती म्हणून प्रपंच केला तरी अपुराच पडतो. एखादा म्हातारा माणूस आपण पाहिला तर त्याचा संसार खरे पाहू जाता सर्व झालेला असतो. मुले-बाळे असतात, सर्व तऱ्हेने तो सुखी असतो. परंतु मरणसमयी म्हणतो, नातवाची मुंज पाहिली असती तर बरे झाले असते. माणूस वासनेत कसा गुंतलेला असतो ते यावरून कळेल. संसार कितीही केला तरी तो पुरा होऊ शकत नाही, तो अपूर्णच राहतो. मनुष्याच्या जीवनाची तळमळ परमेश्वरप्राप्तीशिवाय शमूच शकत नाही. त्याच्या जीवाला समाधान एका परमेश्वरभेटीतच मिळू शकते आणि याकरिता आयुष्याच्या सुरूवातीपासूनच नामाची कास धरा. हेच नाम मृत्युसमयी तुम्हाला परमेश्वराची भेट करवून देईल याची पूर्ण खात्री बाळगा. अत्यंत गुह्यातील गुह्य जे आहे ते मी तुम्हाला सांगतो. नामाचे प्रेम हेच ते गुह्य होय. आपण मागितलेले भगवंत पुरवू लागला, तर त्याला आपल्यासाठी चोवीस तास राबावे लागेल आणि इतके करून आपले अपुरेच राहील.